दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४१ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२८ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.





# मराठी दुर्गा उत्सव मंडळाच्या दांडिया व गरबा स्पर्धेला वरोरा वासियांचा भरभरून प्रतिसाद

## साई डान्स स्टुडिओ ग्रुप ठरला प्रथम विजेता;अध्यक्ष मुकेश जिवतोडे यांचे उत्कृष्ट आयोजन






**वरोरा । प्रतिनिधी**

येथील मराठी दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने भव्य गरबा व दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला वरोरा वासियांनी भरभरून प्रतिसाद दिला असून स्पर्धा बघण्यासाठी तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्तीथी दर्शविली होती. या स्पर्धेत साई डान्स स्टुडिओ ग्रुप प्रथम विजेता ठरला असून आर्य ग्रुप द्वितीय तर जय माता जी ग्रुप तृतीय विजेता ठरला.

मराठी दुर्गा उत्सव मंडळ गेला १५ वर्षापासून दरवर्षी नवरात्री निमित्त दुर्गा मातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व घटस्थापना करून विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. यावर्षी सुद्धा मंडळाचे अध्यक्ष मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात भव्य रास गरबा व दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्रीच्या ९ दिवस चालेल्या कार्यक्रमात पत्रकार, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी मंडळ, डॉक्टर, नगर परिषद कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व विशेष कर्तुत्वान व्यक्तींचा मंडळाच्या वतीने सन्मान तसेच सत्कार करण्यात आला. या स्पर्धामध्ये तरुणाई मोठ्या प्रमाणात सहभागी होत त्यांच्यातील कलाविष्काराचे सादरीकरण केले.तसेच तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो नागरिकांनी याठिकाणी उपस्थिती दर्शवत गरबा तसेच दांडिया खेळण्याचा आनंद लुटला. या स्पर्धेत साई डान्स स्टुडिओ ग्रुप ने प्रथम पारितोषिक मिळवले तर आर्या ग्रुप द्वितीय व जय माता जी ग्रूपने तृतीय पारितोषिक मिळवले.तसेच या स्पर्धेचे बेस्ट कपल प्रथम बक्षीस शुभम नकवे व सम्यता जूनघरे तर द्वितीय कुणाल बिरिया व श्रुती कुरेकार व तृतीय बक्षीस अनिकेत तुराणकर व श्रेया मेश्राम यांनी देण्यात आले. तसेच बेस्ट ऑफ वरोरा (पुरुष) संकेत तुराणकर व बेस्ट ऑफ वरोरा (महिला )ज्ञानेश्वरी पाल यांना बक्षीस देण्यात आले.यावेळी मंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे, भरत तेला, रवी बिरीया,मंगेश डाहुले,सतीश कतोरे, पंकज खाजोने, हर्षल मोटके, निकेश मोटके,अतुल नांदे , विक्रम कुंभलकर,गणेश साठे,राहुल पानघाटे, सौरभ कातोरे, शुभम काकडे, पंकज बोडे, हर्षद घोडीले, विपुल पिदुरकर, दीप कतोरे , राकेश नावघरे, सोहम भोयर, प्रशांत भोयर, ऋतिक भोयर, तेजस वंदिले, कुणाल तारशेट्टीवार, तेजस भोयर, रोशन वरघणे,सागर क्षीरसागर,अमित निब्रड, दिनेश यादव,मनीष काळबांडे, शरद परसुटकर आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वरोरा कार्याध्यक्षपदी नगाजी निंबाळकर

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट व अजित पवार गट अशा दोन गटात विभागणी झाल्यानंतर प्रथमच वरोरा येथील



विश्रामगृहांमध्ये २७ ऑक्टोम्बर २०२३ ला आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीला शरद पवार गटाचे निरीक्षक रा.का.पार्टी चंद्रपूर दिलीपराव पनकुले यांचे नेतृत्वात व जिल्हा अध्यक्ष राजु वैद्य यांच्या उपस्थित घेण्यात आली. यावेळेस वरोरा येथील नगाजी निंबाळकर यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी विधानसभा अध्यक्ष जयंत टेमुर्डे, तालुका अध्यक्ष अविनाश ढेंगळे,जिल्हा महासचिव राजेंद्र वरघणे, तालुका अध्यक्ष सुशीला तेलमोरे, शहर अध्यक्ष सुनीता राऊत,यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशाने 'गाव तिथं राष्ट्रवादी मी महाराष्ट्रवादी' ही संकल्पना राबविण्याबाबत आढावा बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत निष्ठावंत कार्यकर्ते बंडू भोंगाडे,अरुण सहारे, बंडू खारकर,नगाजी निंबाळकर, प्रकाश काकडे, ईश्वर पावडे, मनिषा सावसाकडे,डॉ.अडबायले ,भानुदास राऊत यांची उपस्थिती होती.

## गोंडपिपरीतील दोन कोटींच्या विकासकामांचा मार्ग मोकळा

### आ.धोटेनी जिंकली शासनाविरुद्ध लढाई;ग्रामीण रस्ते विकासासह सामाजिक विकासही होणार

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे यांच्याकडून गोंडपिपरी तालुक्याच्या विकासाकरिता वेगवेगळ्या पटलावर प्रयत्न सुरू आहेत.अशावेळी अचानक सत्ता बदल झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात विकास निधीवर यावेळच्या राज्यकर्त्यांनी ब्रेक आणला.दरम्यान न्यायालयीन लढाई नंतर स्टे उठला व प्रस्तावित कामांना चालना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.आमदार सुभाष धोटे यांचा सातत्य पूर्ण पाठपुरावा आणि त्यांच्या सरकारला वेटीस धरण्याच्या भुमिकेमुळे आता गोंडपिपरी तालुक्यातील ग्रामीण रस्ते विकासाच्या निधीचा प्रश्न सुटला असून लवकरच तालुक्यात सुमारे दोन कोटी रुपयांच्या विकास कामाला सुरुवात होणार आहे.

आमदार सुभाष धोटे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल गोंडपिपरी तालुक्यातील अडेगांव येथील उध्दव झाडे ते पत्रुजी पिपरे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रिट बंदिस्त नाली बांधकाम प्रत्यक्षात साकारणार आहे.याशिवाय पोडसा गावातील जिल्हा परिषद शाळा ते मुख्य चौकापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम देखील लवकरच पूर्ण होईल.तालुक्यातील चेक दरूर येथील रमेश एकोणकर ते कवडू पोटगले, बंडू चौधरी ते दामोधर झाडे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रिट बंदिस्त नाली बांधकाकाकरिता सुभाष धोटे यांच्याकडून प्रयत्न करण्यात आला होता.सरांडी गावातील बस स्टॉप ते रावजी मेश्राम यांच्या घरापर्यंत मंजूर असलेला सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकामाचा मार्ग आता मोकळा झाला आहे.याशिवाय तालुक्यातील चेकबापुर येथील सुरेश पुङ्खलवार यांच्या घरापासून ते मेन रोडपर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम लवकरच पूर्णत्वास



येईल.धानापुर (साईनगरी) क्रिडा सुकुल ते संजु पूद्दटवार यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकामाकरीता सुभाष धोटे यांच्याकडून प्रयत्न करण्यात आला.गणेशपिपरी येथील अमित दुर्गे ते विजय गुरू,ग्राम पंचायत कार्यालयापासून दवाई कळते यांचे घरापासून सिमेंट काँक्रिट रस्ता निर्मितीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.याशिवाय तालुक्यातील वेजगांवातील ऋषी चंद्रगिरवार ते परशुराम लेडांगे यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकामाकरीता निधी खर्च होण्यासाठी आता कुठलीच अडचण राहणार नाही.दरम्यान जिल्ह्याचे माजी पालकमंत्री विजय वडेट्टीवार आणि आमदार सुभाष धोटे यांनी सरकारला जेरीस पकडून हा विषय सोडविला. तालुक्यातील करंजी गावच्या गुरूदेव सेवा मंडळ जवळील समाजभवनाच्या बांधकामासह तेथील राजमाता बहुउद्देशीय संस्थेजवळील सामाजिक सभागृहाचा देखील प्रश्न मिटला आहे.त्यासाठी सुमारे ५५ लाख रुपये खर्च होणार आहेत.

# समाजातील वैचारिक प्रदूषण थांबविण्यासाठी निर्भीड, परखड पत्रकारिता आवश्यक-वने,संस्कृतिक कार्ये व मत्स्यव्यवसाय मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार

## ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांना कै. काकासाहेब पुरंदरे पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**मुंबई । प्रतिनिधी**

हवा प्रदूषण संपवता येईल, जलप्रदूषण थांबवता येईल, माती प्रदूषणावर उपायही शोधता येतील परंतु वर्तमान स्थितीत जे वैचारिक प्रदूषण पसरविण्याचा प्रयत्न होत आहे ही गंभीर बाब असून त्यावरील उपाय किंवा उत्तर हे भाऊ तोरसेकर यांच्यासारखे निर्भीड पत्रकार आहेत असे स्पष्ट करत भाऊ तोरसेकर यांच्या भूमिकेचा सन्मान केल्याबाबत मनापासून आनंद व समाधान होत आहे असे प्रतिपादन राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य, व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज व्यक्त केले.




दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक येथे आयोजित कै. काकासाहेब पुरंदरे स्मृती पत्रकारिता पुरस्कार प्रदान समारंभात ना. मुनगंटीवार बोलत होते. आचार्य अत्रे स्मारक समितीच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांना यावर्षी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले, ग्रामीण विकास मंत्री ना. गिरीश महाजन, मनसे नेते संदीप देशपांडे, अत्रे स्मारक समितीच्या अध्यक्षा आरती सदावर्ते –पुरंदरे, भाजपाच्या माहीम विधानसभा प्रमुख अक्षता तेंडुलकर मंचावर उपस्थित होते.यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, पत्रकारिता या क्षेत्राकडे कधीच व्यवसाय म्हणून बघितले गेले नाही; ते एक 'मिशन' मानले गेले आहे. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राची सुरुवात समाजाकरिता आरसा म्हणून पत्रकारितेकडे बघितले जावे या भावनेतून केली असावी असा मला विश्वास आहे. अत्यंत जबाबदारीने प्रत्येक गोष्ट समाजासाठी लिहिणे, दाखविणे हे या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. समाजाला दिशा द्यायची की समाजाची दशा करायची हे पूर्णतः या क्षेत्रावर निर्भर आहे. कारण चुकीची माहिती लाखो लोकांचे सामान्य ज्ञान बिघडविण्यास कारणीभूत ठरू शकते, याचं गांभीर्य लक्षात घेतलं पाहिजे असेही ते म्हणाले. आम्हाला संस्कारीत लोकशाही हवी आहे की स्वैराचारी लोकशाही याचा विचार करण्याची वेळ आली असून, संविधानातील हक्क आणि अधिकार याबाबत सर्वच बोलतात मात्र कर्तव्य काय आहेत याकडे लक्ष देण्याची गरज आहे. यासाठी जनजागरण करण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, भाऊ तोरसेकर अतिशय निर्भीड व परखड पत्रकार आहेत. धनासाठी काम करणारी काही मंडळी या क्षेत्रात आहे अशी चर्चा सुरु असतानाच मनासाठी लिहिणारे, समाजासाठी बोलणारी हे आवर्जून अधोरेखित व्हावं अशी पत्रकारिता भाऊ तोरसेकर यांनी केली आहे.पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणात पत्रकारितेतील त्यांचे अनुभव, सामाजिक राजकीय निरीक्षणे मांडून सत्काराबद्दल आभार व्यक्त केले. ना. रामदास आठवले, ना. गिरीश महाजन यांनीही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरती सदावर्ते–पुरंदरे यांनी केले.

**प्रत्येक धर्मात दान करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. सनातन धर्मातही दानाचे महत्त्व सांगितले आहे. असे मानले जाते की , दान केल्याने मनुष्याचे इहलोक आणि परलोकात कल्याण होते असाही अनेकांचा समज आहे. त्यामुळे पूर्वी आणि आजही दानधर्म करण्याकडे अनेकांचा कल असतो.मात्र पूर्वीचे दानदाते नावासाठी वा प्रसिध्दीसाठी नव्हे तर स्वान्तसुखाय मनोभावे दान करीत. ते करताना या हाताचे त्या हाताला कळणार नाही याची खबरदारी घेत.पण आजच्या बदलत्या काळात लोकांसाठी परोपकाराचा अर्थ केवळ आणि केवळ प्रसिद्धीसाठी पैसे वा वस्तू दान करण्यापुरता मर्यादित राहिला आहे. स्वार्थ ठेवून जे केले जाते ते दान कसले? परमार्थ कसला?ती ठरते केवळ नौटंकी!**

# दे दान....




भारतीय संस्कृतीमध्ये दानाचे महत्त्व अद्वितीय असे आहे. पूर्वी आपले पूर्वज विविध प्रसंगांचे औचित्य साधून दान करायचे. मात्र हे दान करताना त्यांना कुठल्याही प्रकारच्या प्रसिद्धीची वा नांव कमविण्याची हाव असल्याचे दिसत नाही. अगदी निर्मळ मनाने कुठल्याही प्रकारच्या फळाची अपेक्षा न करता दान करत. आजही अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. त्यांनी दान केले परंतु ते दान करताना कुठल्याही प्रकारचा स्वार्थी भाव मनात ठेवला नाही. आपले नांव होईल अशी मनीषा मनात बाळगली नाही. माझ्या परीचयात असे अनेक दानशूर व्यक्ती आहेत की ज्यांच्या पूर्वजांनी दहा दहा एकर शेती घरी काम करणाऱ्या घरगड्यांना, परीचीत स्नेहीजनांना, गरजवंताला, बलुतेदारांना दान म्हणून दिली आहे. मिळालेली शेती आजही ज्यांना दान मिळाली त्यांचे वारसदार अभिमानाने त्यांचे नाव घेत राबवित आहे. घरदार ,पैसे,सोने,चांदी यासारख्या अनेक वस्तू दान करणारे दाते शिरगिणतीतही नसेल एवढी संख्या आहे. एवढी मोठी संपत्ती दान करताना त्यांनी मनामध्ये कोणत्याही प्रकारची स्वार्थलोलूप भावना मनात न बाळगता अगदी निःस्वार्थी भावनेने दान केल्याने कितीतरी व्यक्तिमत्वे आपल्याला आठवतात. अनेक दानशूर आजही स्मृतीपटलाच्या बाहेर असतील. महाभारतातील कर्ण तर दानशूर म्हणून सर्वज्ञात होता. दानाचे प्रतिक म्हणून आपण त्याला ओळखतो. कर्णच काय त्या काळात सर्वसामान्य माणसे सुद्धा निःस्वार्थ अपेक्षेने मोठ्या प्रमाणात दान करीत. मात्र ते दान करताना या हाताची खबर त्या हाताला कळणार नाही याचीही काळजी घेत.अलीकडेही अनेक मंडळी दान करतात, नाही असे नाही. विशेषतः राजकीय क्षेत्रातील मंडळी दान करताना मोठ्या प्रमाणात वाचनात येते. पण त्यांच्या दान देण्यामध्ये निःस्वार्थ भावना दिसत नाही. गरजूंना दान करताना ते जणू काही आपण खूप मोठी संपत्ती लुटून दिली असा आविर्भाव दाखवतात. कष्टाने कमवलेली स्वतःची संपत्ती उधळून वाटत आहे की काय अशाप्रकारे अविर्भाव दाखवतात. दान करतानाचे फोटो आणि बातम्या प्रसिद्धी माध्यमांमध्ये कशा छापून येतील याचीच जाणीवपूर्वक काळजी घेतली जाते.अनेकदा पेड न्यूज छापून आणल्या जातात. आपण फार मोठे दानशूर मसिहा आहोत अशा प्रकारचा भास जनतेत निर्माण करतात. काही दिवसांपूर्वीचा एक प्रसंग मला आठवला तो मुद्दाम सांगावासा वाटतो. एकदा राजकीय पक्षाच्या राष्ट्रीय स्तरावरील नेत्याचा वाढदिवस होता. आपल्या लाडक्या राजकीय नेत्याचा वाढदिवस शहरातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळे वाटून साजरा केला. रूग्णालयात रूग्णांच्या हातात केवळ दोन केळी देऊन त्याच्या आजूबाजूला दहा बारा स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सिना चौडा करीत मान तुकवत उभे राहून फोटो काढले. केळाची किंमत साधारणतः किती असेल.चार ते पाच रुपये असेल. पण फोटो आणि बातम्यांच्या माध्यमातून जणू काही आपण चार-पाच लाख रुपये वाटले की काय असा अविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट झळकत होता. थोडीही जनाची नाही तर मनाची लाज वाटत नसेल काय अशा लोकांना? आपण वाटतो किती? दाखवतो किती? केवढी ही गरिबांची आणि गरिबीची थट्टा. अरे द्यायचेच आहे मनापासून द्याना. घेणाऱ्यालाही आनंद मिळाला पाहिजे.नेत्यांचा वाढदिवस साजरा करायचा आहे तर खुल्या मनाने करायला पाहिजे. केवळ फोटो काढून बातम्यांमध्ये नाव येण्यापुरता जर दानाचा कार्यक्रम होत असेल तर अतिशय लज्जास्पद गोष्ट आहे. अशा छापून आलेल्या बातम्यांमुळे जरी वरिष्ठ नेतेमंडळी खुष होत असेलही तरी जगामध्ये मात्र आपले असे होते, आपली लायकी दिसते याचेही भान राहत नसेल तर हे कसले नेते? त्यापेक्षा दान न केलेले बरे. आवळा देऊन पोवळा काढत केवढी ही प्रसिद्धीची हाव. हे लक्षात ठेवा कुठलाही दान करणारा प्रमाणिक माणूस दाखवूनदाखवून दानधर्म करत नसतो. ज्यांच्या मनात दानधर्म करायची प्रामाणिक भावना असेल तो दान केल्याची बातमी तर सोडाच साधा फोटोही काढणार नाही.आणि तोंडावर विषयही काढत नाही. या हाताची गोष्ट त्या हातालाही लागू देत नाही. अशी आजही अनेक मंडळी असतील परंतु आपल्याला माहित नाही. मात्र आपले राजकीय लोक अगदी उलटउलट वागतात. अनेक राजकीय लोक इकडला तिकडला गैरमार्गाने कमवलेला पैसा दानाच्या नावाने स्वप्रसिध्दीसाठी वाटतात.आपण फार मोठे दानशूर आहोत असे जगाला भासवतात. गरजूंनी अशा पांचट नकली तथाकथित दानशूरांपासून सावध असायला पाहिजे. गरिबांनाही काही स्वाभिमान आहे की नाही. वेळप्रसंगी मी उपाशी मरीन पण अशा लोचटांकडून कोणत्याही प्रकारची मदत घेणार नाही असा निर्धार मनात बाळगला पाहिजे. किंवा अशा प्रसिद्धीलोलूप बकासुरांना दोन खडे बोल सुनावून आपल्या गरिबीचा कोणी गैरवापर करणार नाही व स्वतःचे पितळ पांढरे करून घेणार नाही याची काळजी घ्यायला पाहिजे. गरीबी ही काही माणसाच्या आयुष्यात जन्मभर राहणारी गोष्ट नाही. प्रत्येकाचे दिवस पालटत असतात. आजचा गरीब उद्या श्रीमंत होतो. आजचा श्रीमंत उद्या गरीब होतो हे सृष्टीचे चक्र आहे. माणसाने गरिबी आली तर लाजू नये आणि श्रीमंती आली तर माजू नये. वेळ प्रत्येकावरच येते. परंतु पैशांनी गब्बर असलेल्यांनी मात्र गरिबांची आणि गरिबीची चेष्टा करू नये. दान द्यायचे आहे तर निःस्वार्थी असावे. दानधर्म करायचाच आहे तर निदान गरजूंची एक दिवसाची चिंता मिटेल एवढे तरी द्यावे. निदान दोन वेळच्या जेवणाची चिंता तरी मिटायला पाहिजे. दोन केळी हातात देऊन दानशूरपणाचा दिंढोरा पिटविणे म्हणजे माणुसकीला काळीमा फासल्या सारखेच नाही का?

# लढाईला तोंड फुटले

लोकसभेच्या निवडणुकांना अजून अवकाश आहे. मात्र, त्या आधी राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगण आणि मिझोराम या पाच राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. अनेकदा या दोन्ही निवडणुकांमधील मतदारांचा कौल वेगळा किंबहुना काहीवेळा परस्परविरोधी असू शकतो. तसे या आधी झालेही आहे. तरीही, देशातील राजकीय वाऱ्यांचा अंदाज येण्यासाठी या राज्यांच्या निवडणुका महत्त्वाच्या आहेत. 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीचे नेमके काय होणार, हे अद्याप माहीत नाही. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार अस्वस्थ असल्याच्या वावड्या आहेत. मात्र, नितीश यांचे वागणे अलीकडे इतके बेभरवशाचे झाले आहे की, वावड्या सत्यातही उतरू शकतात. महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला विरोधक बरोबर घेतात की नाही, हे समजायला तयार नाही. आंबेडकरांनी तर स्वबळावर सर्व ४८ जागा लढविण्याचा निर्धार बोलून दाखविला आहे. दक्षिणेत देवगौडा यांचा जनता दल-धर्मनिरपेक्ष हा पक्ष भाजपप्रणित एनडीएमध्ये येत असतानाच अण्णा द्रमुक एनडीएमधून बाहेर पडला आहे. तामिळनाडूतील प्रादेशिक वरचष्मा असणारे राजकारण राष्ट्रीय पक्षांना नेहेमीच त्रासदायक ठरत आले आहे. राजीव गांधी यांची तामिळनाडूत हत्या होण्याआधीपासूनचा हा सलग इतिहास आहे. तिकडे पंजाबात मात्र अकाली दलाने पुन्हा एकदा आपला जुना मित्र असणाऱ्या भारतीय जनता पक्षासोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.या साऱ्या राजकीय घडामोडी, आघाड्या, युती आणि पक्षांतरे यांना आता वेग येईल. काही धक्कादायक आणि अनपेक्षित घटनाही घडतील. अनेकदा एखाद्-दुसरी घटना किंवा घडामोड प्रचाराचा सारा रोखच बदलून टाकते. असे यापूर्वी घडले आहे. मात्र, असे असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेसचे सूर सापडलेले माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी मैदानात उतरण्याआधीचे हाकारे भरण्यास जोरदार सुरुवात केली आहे. या दोघांच्याही ताज्या भाषणांमधून भाजप आणि काँग्रेसचा रोख कसा असणार आहे, याची थोडी फार कल्पना येते. राहुल गांधी हे अलीकडे वारंवार देशातील ओबीसींच्या प्रश्नांवर भर देत आहेत. ओबीसी हा भारतीय जनता पक्षाचा सगळ्यांत मोठा आणि विश्वासार्ह असा जनाधार आहे. महाराष्ट्रात जसे 'माधव' (माळी, धनगर, वंजारी) हे समीकरण भाजपने ऐंशीच्या दशकात रूढ, लोकप्रिय केले; तसेच, देशभरात महत्त्वाच्या प्रबळ जातींपेक्षा इतर मागास वर्गाकडे भाजपने खास लक्ष दिले. त्यानंतरच्या टप्प्यात आदिवासी आणि भटक्या विमुक्तांकडेही भाजपने खास लक्ष दिले. हा जनाधार तोडण्यासाठी राहुल गांधी यांनी महिला आरक्षण विधेयकाच्या संदर्भातही ओबीसी आरक्षणाचा विषय उपस्थित केला होता. ओबीसींना विधिमंडळे किंवा संसदेत आरक्षण देण्याचा सध्या कोणताही प्रस्ताव नाही. मात्र, तो येवो अथवा न येवो; कधी ना कधी जनगणना करताना जातगणना करणे आवश्यक ठरणारच आहे. त्याशिवाय, महिला आरक्षणातील एससी, एसटी पोट-आरक्षणही नेमके होणार नाही. महिला आरक्षण प्रत्यक्षात येण्यास अवधी असला तरी त्याचा राजकीय लाभ कितपत होईल, याचा अंदाज भाजप घेत आहे. मात्र, त्याचवेळी भाजपच्या भात्यामध्ये आक्रमक राष्ट्रवादाच्या परिघातले अनेक विषय असतात. त्यातील एका बाणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हात घातला आहे. 'काँग्रेस पक्ष शहरी नक्षलवाद्यांच्या नादाला लागला आहे..' हा काही भाजपचा नवा आरोप नाही. तो राजधानीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कन्हैया कुमार व इतरांच्या आंदोलनांपासून होत आला आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असताना 'खरा कारभार सोनिया गांधी यांची सल्लागार परिषद करते आणि या परिषदेत 'अर्बन नक्सल' व्यक्तींचा वरचष्मा होता' असे आरोप या आधीही होत आले आहेत. काही काळापूर्वी काँग्रेस ही देशातील एनजीओ म्हणजे स्वयंसेवी संघटनांसारखी काम करते, असे म्हटले जाई. आता मोदी यांनी काँग्रेसचे तळागाळात मुरलेले, गावगाड्याशी नाते असणारे सारे नेते मागे पडले आहेत आणि कायमचे मौनात गेले आहेत, अशी तोफ डागली आहे. भाजपमधील किती तळागाळातील नेते स्वतंत्रपणे बोलण्याची हिंमत बाळगून आहेत, असा प्रश्न त्यांना कुणीतरी उद्या विचारेलच. मात्र, आजची काँग्रेस ही जुनी स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास असणारी काँग्रेस नाही, तो आता गंभीर राजकारण करणारा पक्षच उरला नसून भरकटला आहे, असे मोदी सूचित करत आहेत. इतकेच नव्हे तर 'राष्ट्रवादी भाजप' विरुद्ध 'देशद्रोह्यांशी संगनमत करणारा काँग्रेस पक्ष' असे समीकरण मतदारांच्या मनात ठसविण्याचा मोदींचा रोख आहे. त्यांनी दिलेला हा सिग्नल एव्हाना खालपर्यंत सगळ्यांनी पकडलाही असेल.राहुल गांधी यांनी आपली जुनी प्रतिमा पुसून काढत प्रचार चालविला आहे, त्यालाही बराच काळ लोटला. मात्र, 'इंडिया' या आघाडीत जमा झालेली दिग्गज नेत्यांची प्रभावळ त्यांना पूर्णपणे साथ देते आहे, असे चित्र अद्याप उभे राहिलेले नाही. नितीश यांचे वेगळेच काही चालू असते. शरद पवार महिला आरक्षणाचे काम आपण आधी केले, हे सांगून मोदींवर टीका करीत असले तरी त्यांच्यावर इतरांचा कितपत विश्वास उरला आहे, हे कळायला मार्ग नाही. काँग्रेसचे नेतृत्व ममतांना चालणार नाही. अशावेळी, देशव्यापी सामना पुन्हा नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी असा उभा राहतो आहे का, ते काही दिवसांतच स्पष्ट होईल. तसे होणारच असेल तर राहुल गांधी यांना किंचितही ढिले पडून चालणार नाही. आता लढाईला तोंड फुटलेच आहे.

# भारताच्या विकासगंगेची पंचारती

देशांतर्गत सामाजिक-आर्थिक-राजकीय परिस्थितीच्या भक्कम पायावर विकसित देश होण्याचं स्वप्न आपण पाहात आहोत. लोकसंख्याशास्त्रीय लाभांश, कर्जांची सुलभ स्थिती, जागतिकीकरणाची उलटी गंगा, डिजिटायझेशन आणि कर्बोत्सर्गातील घट यांच्या पंचारतीतून हे स्वप्न बाळसं धरेल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत...

भारत २०४७मध्ये स्वातंत्र्याचा शतकमहोत्सव साजरा करणार आहे. त्या वळणावर विकसित देश होण्याचं उद्दिष्ट आपण निश्चित केलं आहे. येत्या पाच वर्षांतच जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याचा संकल्प आपण केला आहे.अमेरिकादी पाश्चात्त्य देश आणि चीन व रशिया यांसारखे त्यांचे कट्टर विरोधक यांच्यात संतुलन साधणारा देश म्हणून आपलं स्थान जगाच्या नकाशावर प्रस्थापित होत आहे.जी-२० गटाच्या नवी दिल्लीत नुकत्याच झालेल्या परिषदेत सर्व देशांत मतैक्य घडवून आणण्याची भारताची यशस्वी शिष्टाई हे त्याचंच प्रतीक आहे.जागतिक हवामानबदलांच्या संकटावर उतारा ठरू शकणाऱ्या आंतरराष्ट्रीय सौर महासंघाच्या जोडीला आता जागतिक जैवइंधन महासंघही प्रस्थापित करण्यात काळाची पावले ओळखणारा पुढाकार भारतानं घेतला आहे.त्याच्याहीपुढे जात आखाती देश आणि युरोप यांना जोडणारा ८१६६ किलोमीटर लांबीचा आर्थिक मार्गही आपण साकारला आहे. हे सर्व बिंदू जोडताना नव्या भारताचं नवं चित्र समोर येत आहे आणि वर्तमानातल्या कृतींमधून ते अधिक उठावदार ठरत आहे.या सर्व आश्वासक घडामोडींची पार्श्वभूमी मात्र काहीशी काळवंडलेली आहे. कोरोनाच्या महासाथीतून जग आता कोठे सावरत आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाला वर्ष उलटले तरी त्याला विराम मिळण्याची चिन्हे दिसत नाहीयेत.स्त्री भ्रुण हत्येच्या प्रमाणातील घट, स्त्री-पुरुष प्रमाणामध्ये येऊ लागलेला समतोल आणि बालमृत्यूंमधील घट ही त्याची महत्त्वाची निदर्शक आहेत. ऋआधार' व्यवस्थेनं प्रत्येक भारतीयाला दिलेली ओळख क्रांतिकारी ठरत आहे.समाजातील गरजू घटकांना शासकीय योजनांतील अर्थसाह्याची रक्कम थेट बँकखात्यांत पाठवणं (डीबीटी) त्यामुळे साध्य झालं आहे. दारिद्र्य निर्मूलनाच्या प्रयत्नांना ते मोठं कारण ठरत असल्याचं संयुक्त राष्ट्रसंघाने गेल्याच महिन्यात प्रसिद्ध केलेल्या अहवालात नमूद केलं आहे.अर्थकारण:मागणी आणि पुरवठा या दोन्ही साखळ्यांत समतोल साधणं हे अर्थचक्राची गती राखण्यासाठी आवश्यक ठरतं. भारतानं गेल्या दशकात कंपनीकरात कपात करून आणि वस्तू व सेवा कर लागू करून पुरवठ्याच्या बाजूत सुसूत्रता आणली आहे.पायाभूत सोयींमध्ये भरीव वाढ, नादारी आणि दिवाळखोरी विषयक कायदा, बांधकाम क्षेत्र नियमन कायदा (रेरा) यांमुळे उद्योजक आणि व्यावसायिक यांचा कारभार आणि त्यांचे नियमन हे दोन्ही सुटसुटीत झाले आहे. अर्थात, व्यवसाय करण्यायोग्य वातावरणनिर्मितीसाठी आपल्या देशाला अजून मोठी मजल गाठावी लागणार आहे.राजकारण:दक्षिण आशियातील शेजारी देशांच्या तुलनेत भारतातील राजकीय स्थैर्य उठून दिसते. आघाडी सरकारांच्या कार्यकाळातून बाहेर पडून आपला देश गेले एक दशक हा अनुभव घेत आहे. असे स्थैर्य विकास आणि प्रगतीसाठीचा कार्यक्रम राबवण्यातील ठोसपणाला पोषक ठरते.एकेकाळी विकासाच्या वाटेवर आपण ज्यांच्या बरोबरीला होतो, त्या चीनने गेल्या दोन दशकांत जी घोडदौड केली, तेव्हा जागतिकीकरणाच्या प्रवाहानं जोर धरला होता आणि जगभरातील भू-राजकीय वातावरणही विकासानुकूल होतं.आता जागतिकीकरणाची चक्रं उलटी फिरवली जात आहेत आणि एकीकडे



अमेरिका-चीन संघर्ष व दुसरीकडे रशिया-युक्रेन युद्ध यांमुळे जागतिक पटलावर अस्थिरतेचं साम्राज्य आहे. परंतु या बाह्य प्रतिकूलतेमध्येही आपल्या शिडांमधील हवा आपल्या जहाजाला किनाऱ्याकडे सुरक्षित पोचवण्याची दिशा देत राहील, अशा परिस्थितीत भारत आहे. हा विश्वास देणाऱ्या कारणांना आपण बलशाली भारतासाठीची पंचारती म्हणू.

१. लोकसंख्याशास्त्रीय लाभांश (डेमोग्राफिक्स) : जग प्रौढत्वाकडे आणि काही प्रदेशांत तर वार्धक्याकडे वाटचाल करत आहे. सरासरी २७ वय असलेला भारत हा याला कर्तं मनुष्यबळ उपलब्ध असलेला ठळक अपवाद आहे.

मनुष्यबळाची कुशलता वाढवणं, त्यामधील महिलांचा सहभाग वाढवणं आणि कामगार कायद्यांत आणखी सुटसुटीतपणा आणणं या अपेक्षांची आणखी दखल घेण्याची गरज आहे. परंतु त्या दिशांनी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनांसारखे प्रयत्नही केले जात आहेत.

२. कर्जांच्या आघाडीवरील सुस्थिती:कर्ज म्हणजे भविष्यातील तजवीज आजच खर्ची घालण्याचा मार्ग. भारतावरील कर्ज आणि कर्जाचे आपल्या सकल देशांतर्गत उत्पादनाशी (जीडीपी) असलेले प्रमाण हे दोन्ही अन्य अनेक विकसित देशांच्याही तुलनेत आवाक्यातील आहे. संसदेत मांडलेल्या २०२२-२३च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार हे प्रमाण १७०टक्के आहे.याचेच जगभरातील प्रमाण २४८ टक्केआहे आणि अमेरिकेपासून (२६४%) चीनपर्यंत (२९५%) बहुतेक आघाडीच्या देशांत ते त्याहूनही अधिक आहे. या देशांची कर्जफेडीची क्षमताही त्यातून प्रतिबिंबित होत असली, तरी देशांतर्गत अर्थकारणाचे ढोबळ व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापन या दोन्ही दृष्टींनी आपणसमाधानकारक स्थितीत आहोत, हे महत्त्वाचे आहे.

३.जागतिकीकरणाची उलटी गंगा(डीग्लोबलायझेशन) :जागतिकीकरणाच्या चार ते पाच दशकांत संपूर्ण जग परस्परविश्वासातून एकमेकांशी व्यापारसंबंध वृद्धिंगत करत होते. परंतु कोरोनोत्तर जगातील परिस्थिती बदलू लागली आहे.सद्भावाची जागा अविश्वासानं घेतली आहे. आपल्या पुरवठा साखळ्या एकावलंबी राहू नयेत, यासाठी सर्व बहुराष्ट्रीय कंपन्या प्रयत्नशील आहेत.तंत्रज्ञान, उत्पादन क्षेत्र, कौशल्यविकास या आघाड्यांवर देशांतर्गत क्षमता विकसित करण्यावर जगभरात भर दिला जात आहे. त्यातून भांडवली साधनस्रोतांचा पुरेपूर वापर करण्याची आणि जगभरातील उद्योगांना चीनला भक्कम पर्याय देण्याची संधी आपल्याला उपलब्ध झाली आहे.

४. डिजिटायझेशन:भौतिक पायाभूत सोयींबरोबरच डिजिटल पायाभूत सोयींनाही आज असाधारण महत्त्व आले आहे. आधारच्या रूपातील ओळख, यूपीआयच्या रूपातील देयकभरणा आणि डिजीलॉकरच्या रूपातील डेटा व्यवस्थापन या तीन स्तंभांवर देशस्तरावरील ही व्यवस्था उभी आहे.ई-व्यापार हा आजच्या युगात आपल्या देशाने स्वीकारलेला मंत्र आहे. २०१७मधील ३८.५ अब्ज डॉलरवरून हा व्यापार २०२६पर्यंत २०० अब्ज डॉलरवर जाईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. या क्षेत्रात भारतानं जगभरात आघाडी घेतल्याचे आणि त्यातून सामाजिक सुरक्षा साधल्याचे प्रशंसोद्गार जागतिक बँकेनं काढले आहेत.

५. कर्बघट (डीकार्बनायझेशन):२०२३ हे वर्ष आजवरच्या तापमाननोंदींच्या इतिहासातील सर्वाधिक सरासरी तापमानाचे ठरेल, असा इशारा जागतिक हवामानशास्त्र संघटनेने दिला आहे. या तापमानवाढीचे दुष्परिणाम आटोक्यात ठेवण्यासाठी तातडीच्या उपायांची गरज आहे.सुदैवाने, भारताचा दैनंदिन दरडोई सरासरी ऊर्जावापर (८०० वॉट) हा अमेरिकेच्या तुलनेत (९००० वॉट) खूप कमी आहे. भविष्यातील आपल्या वाढीव मागणीला प्रतिसाद देण्यासाठीही आपण १७४ गिगावॉट एवढी अक्षय ऊर्जानिर्मिती क्षमता स्थापित केली असल्याचे आंतरराष्ट्रीय ऊर्जा आयोगाने म्हटले आहे. २०३०पर्यंत ही क्षमता ५०० गिगावॉटपर्यंत नेण्याचा आपल्या देशाचा निर्धार आहे. आताच आपला देश या क्षेत्रात जगात चौथ्या क्रमांकावर आहे.एकूणच ''नए दौर में लिखेंगे, मिल कर नई कहानी...'' असे म्हणण्याची वेळ आता नक्कीच आली आहे...

# व्यावसायिकतेची रुजवात

पुण्यासारख्या ठिकाणी अनेक तरुण वास्तूविशारद पदवी घेऊन या क्षेत्रात मोठ्या हिरीरीने स्वतःचा व्यवसाय सुरू करतात. 'हुसाको' हा अशाच हृषीकेश ठोके, चैत्राली पदमवार आणि अनुष्का जाधव या तरुणांनी सुरू केलेला व्यवसाय. पदवीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याला उमेदवारी किंवा इंटर्नशिप करावी लागते. ही संधी डोळसपणाने घेऊन हृषीकेशने चक्क नेपाळमधील वास्तूविशारदाकडे काम केले. आव्हानांवर मात करत योग्य निर्णय घेत काम कसे करायचे, याचे प्रशिक्षण त्याला मिळाले. चैत्रालीने प्रस्थापित बांधकाम व्यावसायिकाकडे व्यावसायिक खाचाखोचांचा अनुभव घेतला. अनुष्काने स्टार्टअपमध्ये उमेदवारी केल्याने तेथे वास्तुकलेशी निगडित गोष्टींबरोबर व्यवसायासंबंधित बारकावेही शिकायची संधी तिला मिळाली. या तरुणांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे, तो फक्त अर्थर्जनासाठी नव्हे तर आवडीच्या क्षेत्रात, आपल्या पद्धतीने स्वतंत्रपणे काम करण्यासाठी, आपली ओळख निर्माण करण्यासाठी. व्यवसायातून प्राप्ती कमी-जास्त होणे, त्यासाठी वित्त नियोजन इत्यादी गोष्टी त्यांना अनुभवातून कळत गेल्या. ग्राहक अजूनही वास्तुविशारदाकडे गांभीर्याने पाहात नाही. आर्किटेक्ट अत्यावश्यक नसून काही उच्चभ्रू लोकांचा हौसेचा मामला असतो, असा गैरसमज असतो. ग्राहकांनाही जाणकार करण्याची गरज ओळखून ते त्यांच्याशी संवाद साधतात. अनुभवी वास्तुविशारदांकडून पाठिंबा मिळतो, ते ग्राहकांकडे शिफारस करतात, असा या तरुणांचा अनुभव आहे.



सुरूवात करताना स्वतःचे ज्ञान, कसब आणि आत्मविश्वास हेच प्रमुख भांडवल असल्याने भांडवल उभारण्याचे आव्हान नाही. परंतु वास्तुविशारदाने कल्पिलेले वास्तवात कसे उतरते, हे अनेक पुरवठादार आणि कारागीर व कामगारांवर अवलंबून असते. त्यामुळे एकीकडे ग्राहक आणि दुसरीकडे हे कारागीर यांना सांभाळण्याची कसरत महत्त्वाची.

मध्यमवर्गातील सुशिक्षित तरुणांनी व्यावसायिक पदवी घेऊन चालू केलेली एक फर्म. यात नाट्यमय असं काही नसलं तरी त्यांच्या या 'उद्यम'कथेतून केवळ होतकरू तरुणांनाच नव्हे; तर आजूबाजूच्या व्यवस्थेला अंतर्मुख करायला लावणाऱ्या काही गोष्टी दिसतात.

एक म्हणजे वास्तुविशारद व्यवसायासाठी कोणत्याही प्रकारचे नियमन किंवा कामाचा दर्जा ठरवणारी सर्वसाधारण पद्धती नाही. चार्टर्ड अकौंटन्ट, वास्तुविशारद अशा पदव्यांसाठी उमेदवारी करावी, असा नियम आहे. हे व्यवसायिक प्रशिक्षण असल्याने त्या क्षेत्रातील कामाचा अनुभव घेऊन विद्यार्थ्यांनी शिकावे असा त्यामागचा उद्देश. प्रत्यक्षात बहुतेक विद्यार्थी या उमेदवारीकडे एक उरकण्याची गोष्ट म्हणून बघतात. काही वेळा विद्यावेतन मिळत नाही म्हणून उमेदवारी नाकारतात. मोठ्या कंपन्याही या उमेदवारांना फुटकळ कामे देऊन दुर्लक्षित ठेवतात.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी उमेदवारी आवर्जून एखाद्या नवीन छोट्या कंपनीमध्ये केली पाहिजे. या 'उद्यम'कथेतून प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे एकीकडे व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास यावर भर देणारे धोरण आहे.परंतु त्याचवेळी दुसरीकडे चार-पाच वर्षांच्या 'व्यावसायिक' पदवीच्या काळात 'व्यवसाय' प्रशिक्षण अजिबात दिले जात नाही. परंतु व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ग्राहकाला समजेल अशा पद्धतीने आपल्या व्यवसायातील तांत्रिक बाबींची माहिती कशी द्यावी,व्यवसायाची प्रसिद्धी कशी करावी, ग्राहक मिळवण्यासाठी काय करावे, वित्त-गुंतवणूक बाजू कशी सांभाळावी, आपल्या सहकाऱ्यांशी जुळवून घेऊन कसे पुढे जावे, या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. अशा, 'व्यवसायिकाला' उपयुक्त असलेल्या बाबींचे प्रशिक्षण व्यावसायिक पदवीअभ्यासक्रमात समाविष्ट करणे गरजेचे आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# मराठा आरक्षणाचा तिढा २ दिवसांत सुटेल:मुख्यमंत्री शिंदे मराठा समाजाला न्याय देण्याच्या प्रयत्नांत-आरोग्यमंत्री तानाजी सावंत



**धाराशिव-**मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून अवघ्या राज्याचे वातावरण तापले असताना आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी हा प्रश्न अवघ्या २ दिवसांत निकाली निघणार असल्याचा दावा केला आहे. 'मराठा आरक्षणाचा प्रश्न येत्या २ दिवसांत सुटेल असा मला विश्वास आहे,' असे ते तुळजापूरमध्ये बोलताना म्हणाले. त्यांच्या या दाव्यामुळे अवघ्या राज्याचे लक्ष सरकारच्या संभाव्य निर्णयाकडे लागले आहे.तानाजी सावंत यांनी शनिवारी तुळजापूर येथील महाआरोग्य शिबिरास भेट दिली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न २ दिवसांत निकाली निघण्याचा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, मराठा समाजाला न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तसेच केंद्रातील नेतेमंडळी प्रयत्न करीत आहेत.निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीच्या माध्यमातून युध्द पातळीवर पुरावे गोळा करण्यात येत आहेत. ही समिती प्रत्येक जिल्ह्यात जावून प्रशासन व नागरिकांकडून पुरावे गोळा करण्याचे काम करत आहे. एकूणच हा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी शासनस्तरावर वेगाने काम सुरू आहे. त्यामुळे येत्या २ दिवसांत मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेल अशी आशा आहे, असे तानाजी सावंत म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री मराठा आरक्षणाच्या आंदोलनावर बारीक लक्ष ठेऊन आहेत. एकंतरीत पाहता मराठा आरक्षणाचा विषय एक ते दोन दिवसात सुटेल अशी मला आशा आहे, असेही ते यावेळी पुढे बोलताना म्हणाले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जिल्हाप्रमुख सुरज साळुंके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# फडणवीस-अजित पवारांना पांडुरंग चरणी प्रवेश नाही

**सोलापूर-**कार्तिकी एकादशीच्या दिवशी पंढरपूरमधील पांडुरंगाच्या शासकीय पूजेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रवेश देणार नाही. अशी भूमिका मराठा समाजाच्या वतीने घेण्यात आली आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन मराठा समाज चांगलाच आक्रमक झाला आहे. पंढरपूरमध्ये येण्याचा प्रयत्न केला तर काळे फासू असा गंभीर इशाराच मराठा समाजाच्या वतीने दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आला आहे.पंढरपूर येथील पांडुरंगाची एकादशीची शासकीय महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि मानाचा वारकरी दाम्पत्याच्या हस्ते करण्याची परंपरा आहे. मात्र, कार्तिकी एकादशीला पंढरपूरमध्ये उपमुख्यमंत्र्यांना प्रवेश न देण्याचा निर्धार सकल मराठा मोर्चाने घेतला आहे. त्यामुळे आता या कडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. हा मान कोणत्या उपमुख्यमंत्र्याला मिळतो, याकडे आधीच सर्वांचे डोळे लागले होते. मात्र, आता या पुजेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ही पूजा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या हस्ते करावी, अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

# बीडमध्ये मराठा आंदोलक आक्रमक:माजी मंत्री ठाकरे गटाचे नेते बदामराव पंडित यांची कार फोडली



**बीड-**मराठा आरक्षणावरून आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणाला विरोध करणारे वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता ठाकरे गटाचे माजी मंत्री बदामराव पंडित यांची चारचाकी फोडल्याची घटना घडली आहे. बीडच्या मादळमोही गावात घटना घडली आहे.मराठा आरक्षणावरून राज्यातील राजकारण तापले आहे. मराठा आरक्षणावरून राज्यातील बहुतांश गावात घेरले जात आहेत. मराठा आंदोलकांनी काही दिवसांपूर्वी वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या वाहनांची तोडफोड केली होती. या तोडफोडीच्या घटनेनंतर गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे पाटील आणि मराठा आंदोलकांवर सडकून टीका केली होती. त्यानंतर आता ठाकरे गटाचे माजी मंत्री बदामराव पंडित यांची कार मराठा आंदोलकांनी फोडल्याची घटना घडली आहे. बीडच्या मादळमोही गावात बदामराव पंडित आले होते . त्यावेळी मराठा आंदोलकांनी गाडीवर दगडफेक करत गाडी फोडली. मराठा आरक्षणावरून मराठा आंदोलकांच्या टार्गेटवर राजकीय नेते आणि मराठा समाजातील पुढारी असल्याचे दिसून येत आहे.मराठा आरक्षणासाठी दोन दिवसापासुन मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले. त्यांना पाठिंबा म्हणुन राज्यभरात सकल मराठा समाजाकडून विविध आंदोलन सुरू आहेत. त्यात नेत्यांना गाव बंदीचे निर्णय मोठ्या प्रमाणात गावा गावात घेतले जात आहेत. आरक्षण मिळेपर्यंत कोणत्याच पक्षाच्या पुढाऱ्याने गावात येऊ नये, असा इशारावजा बॅनर गावाच्या शिवेत लावले जात आहेत. नांदेडमधील कंधार तालुक्यातील अंबुलगा गावात देखील नेत्याच्या गाव बंदीचा निर्णय झाला आहे. या गावात भाजपा खासदार प्रताप पाटील चिखलीकर काल रात्री गेले होते. तेव्हा त्यांच्या गाड्या फोडण्यात आल्या. गावातील तरुणांनी चिखलीकर आणि त्यांच्या ताफ्यातील गाड्या फोडल्या. गावबंदीला विरोध नाही. सार्वजनिक आणि राजकीय कार्यक्रमाच्या बंदिला माझा पाठिंबा आहे. पण आपण आजारी मित्राला भेटण्यासाठी गावात गेलो होतो. आजारी नातेवाईक, कार्यकर्ते यांना भेटणे, अंत्यविधीला पुढाऱ्यांनी जायच नाही का? असा प्रश्न चिखलीकर यांनी विचारला. हा उद्रेक योग्य नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.नांदेड जिल्हयातील माहुर येथे आज मराठा आंदोलकानी काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देणार बॅनर फाडल्याची घटना घडली आहे. मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू असल्याने वाढदिवस साजरा करणार नाही, असे अशोक चव्हाण यांनी पूर्वीच जाहीर केले होते. आज अशोक चव्हाण यांचा वाढदिवस असल्याने नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी त्यांच्या समर्थकानी बॅनर लावले. माहूर शहरात बॅनर लागल्याने सकल मराठा समाजाकडून बॅनर फाडून अशोक चव्हाण यांचा निषेध करण्यात आला.

# ठाकरे सरकारमुळेचे महाराष्ट्रातील मोठे उद्योग बाहेर गेले : शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत

**मुंबई-**शिंदे- फडणवीसांच्या काळात राज्यातील उद्योग बाहेर जात असल्याचा आरोप विरोधकांकडून वारंवार होत आहे. या आरोपांना उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी वेदांत फॉक्सकॉन, एअरबस टाटा आणि बल्क ड्रग पार्कसारखे मोठे उद्योग महाराष्ट्राबाहेर जाण्याला ठाकरे सरकारचे जबाबदार असल्याचा गंभीर आरोप केला आहे.महाराष्ट्रातील उद्योग राज्याबाहेर जात असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. शिंदे फडणवीस सरकारच्या काळात अनेक उद्योग गुजरातला हलवण्यात आल्याचा आरोप ठाकरे गटाकडून होत आहे. या आरोपांना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिले असून त्यांनी महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोपही केले आहेत.उद्योग विश्वामध्ये अविश्वासाचं वातावरण निर्माण करणाऱ्या सचिन वाझेच्या मागे ठाकरे उभे होते, त्यांच्यामुळेच उद्योगांसाठी सुरक्षित अशी असलेली मुंबईची प्रतिमाही डागाळली असल्याचा आरोपही त्यांनी केला. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी त्याबद्दल महाराष्ट्राची माफी मागावी असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.सन २०२० साली कोठडीतील आरोपीच्या झालेल्या मृत्यूला जबाबदार धरून पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या सचिन वाझे याला पुन्हा सेवेत रुजू करण्यात आले. आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सचिन वाझे यांना पुन्हा सेवेत घेण्यास सांगितल्याची माहिती आहे. त्यानंतर, वाझे यांनी फेब्रुवारी २०२१ मध्ये भारतातील सर्वात प्रतिष्ठित व्यावसायिक कुटुंबाच्या निवासस्थानाखाली जिलेटिनच्या कांड्या आणि स्फोटकांनी भरलेली कार लावली. खासदार संजय राऊत मार्च २०२१ यांनी वाझेची पाठराखण केली आणि त्याला प्रामाणिक आणि सक्षम अधिकारी असल्याचे सांगितले.

शिंदे गटातील मंत्री उदय सामंत म्हणाले की, उद्योगपतींच्या घराबाहेर स्फोटक ठेवलेल्या सचिन वाजेंचे महाविकास आघाडीचे कर्तेधर्ते संजय राऊत यांनी प्रामाणिक आणि सक्षम अधिकारी म्हणून पाठराखण केली. परंतु या घटनेमुळे मुंबईची तर प्रतिमा मलिन झालीच मात्र व्यावसायिकांमध्ये भितीचे वातावरण होते.शिंदे गटातील मंत्री उदय सामंत म्हणाले की, वाजेंच्या घटनेनंतर व्यावसायिकांना संरक्षण देण्याचे काम या सरकारने केले. विविध धोरण आणि महत्वाचे निर्णय घेत गुंतवणुकदारांना पुन्हा महाराष्ट्राकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केल्याचेही उदय सामंत म्हणाले. मोठ्या प्रकल्पांचे राजकारण करण्याऐवजी गुंतवणुकदारांना आत्मविश्वास देणे गरजेचे होते. ते काम शिंदे- फडणवीस आणि पवार सरकार करत आहे. त्यामुळे ठाकरेंनी जनतेची माफी मागायला हवी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.उद्धव ठाकरेंच्या टीकेला गोगावले यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले. कडेलोटासाठी त्यांनी आधी टकमक टोक पाहिला आहे का? असा रोखठोक सवाल गोगावले यांनी केला.रायगड किल्ला चढून जाण्याची ज्यांच्यात धमक आहे, तेच हे करू शकतात. रायगड किल्ला चढून जाण्यासाठी त्यांच्याकडे कोण आहे? जोपर्यंत आमची नितिमत्ता आणि नियती चांगली आहे, तोपर्यंत कुणीच कडेलोट करू शकणार नाही, असे जोरदार प्रत्युत्तर गोगावले यांनी दिले आहे.

# पंढरपुरात नेत्यांच्या गाड्या अडवल्या आमदार शिंदेंच्या विरोधात आंदोलन

**पंढरपूर । प्रतिनिधी**



आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज आक्रमक झाला आहे. राजकीय नेत्यांना पंढरपुरात प्रवेश बंदी करण्यात आली आहे. विठ्ठल दर्शनासाठी आलेल्या आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री नारायण स्वामी यांचा ताफा मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आडवला. तर माढ्याचे आमदार बबनराव शिंदे यांच्या विरोधात येथील सरगम चौकात आंदोलन केले.भाजप आमदार समाधान आवताडे यांचाही गाडी अडवून आरक्षणाची मागणी केली. मराठा समाजाने पुकारलेल्या आंदोलनामुळे आज दिवसभर शहरात तणावाचे वातावरण होते. बुधवारपासून आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाने पंढरपूर शहर व तालुक्यात साखळी उपोषण सुरू केले आहे.सुमारे ४० हून अधिक गावांनी राजकीय नेत्यांना प्रवेश बंदी केली आहे. आज सकाळी आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री नारायण स्वामी विठ्ठल दर्शनासाठी आल्याचे समजताच मराठा समाजाच्या तरुणांनी मंदिराजवळ नारायण स्वामी यांची गाडी अडवून त्यांच्या समोरच आरक्षण मागणीच्या घोषणा दिल्या.मराठा समाजबांधव आक्रमक झाल्याचे पाहताच पोलिसांनी नारायण स्वामींना अन्य मार्गाने बाहेर नेले. खर्डी येथील मराठा समाजाने आरक्षण मिळेपर्यंत कोणत्याही निवडणुकीसाठी मतदान न करण्याची शपथ घेतली आहे.तर कौठाळी येथे मराठा समाजाच्या तरुणांनी गावातून कँडल मार्च काढला. आज शेगाव दुमालाव पळशी येथील ग्रामस्थांनी राजकीय नेत्यांना गावबंदी केल्याचा ठराव मंजूर केला. येथील मराठा बांधवांनी तहसीलदार सुशिल बेल्हेकर यांना आरक्षण मागणीचे निवेदन दिले.अजित पवार यांच्या सभेत राष्ट्रवादीचे आमदार बबनराव शिंदे यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्याचा निषेध म्हणून आज येथील मराठा समाज बांधवांनी आमदार बबनराव शिंदे यांच्या प्रतिमेला जोडे मारुन आंदोलन केले.येथील सरगम चौकात केलेल्या आंदोलनावेळी आमदार बबनराव शिंदे यांच्या विरोधात घोषणाबाजी करत रोष व्यक्त केला. आमदार शिंदे यांनी समाजाची माफी मागावी अन्यथा त्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही असा इशारा येथील मराठा समाज बांधवांनी दिला आहे.

# अजित पवार लवकरच मुख्यमंत्री होणार:आम्ही कामाला लागलोय; मंत्री धर्मरावबाबा आत्राम

**मुंबई-**लवकरच अजितदादा मुख्यमंत्री होतील, त्यासाठी आम्ही कामाला लागलो आहे, असे विधान राष्ट्रवादीचे आमदार तथा मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात कधी काय होईल याचा नेम नाही. एकीकडे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार, अशी चर्चा रंगली असतानाच दुसरीकडे अजित पवार गटाच्या नेत्याने सूचक विधान केले आहे.दरम्यान धर्मरावबाबा आत्राम पुढे बोलताना म्हणाले की, महायुतीमध्ये ज्या पक्षाच्या सर्वाधिक जागा निवडून येतील, त्यांचाच मुख्यमंत्री असेल असा फॉर्म्युला ठरला आहे, असा दावाही धर्मराव बाबा आत्राम यांनी केला आहे. अजितदादा मुख्यमंत्री होणार, असा आम्हाला विश्वास आहे. आम्ही त्यासाठी देखील कामाला लागलो आहेत, राज्यात अजित पवार गटाच्या सर्वाधिक जागा निवडून येतील असा दावा त्यांनी केला आहे.महाराष्ट्र भाजपकडून एक ट्विट करण्यात आले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली. भाजपकडून ट्विट करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'मी पुन्हा येईन' म्हणत असताना दिसले. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा राजकीय भूंकप पाहायला मिळेल काय? अशी शंका व्यक्त केली जात असतानाच हे ट्विट डिलीट करण्यात आले आहे.दसरा मेळाव्याच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीच्या दौऱ्यावर गेले होते. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाच्या आक्रमक भूमिकेमुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या आमदारांच्या अपात्रतेच्या कारवाईने वेग घेतला आहे. हेच टायमिंग साधत महाराष्ट्र भाजपने देवेंद्र फडणवीसांचा मी पुन्हा येईन हा व्हिडिओ ट्विट केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंप होणार का? अशा चर्चा सुरु झालेल्या आहेत. या संपूर्ण प्रकारानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साम टीव्हीला आपली प्रतिक्रिया दिली आहे. मी भाजपने ट्टीट केलेला व्हिडीओ पाहिला नाही, असं म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावध भूमिका घेतली आहे

# मराठा आरक्षण दिले नाही तर हिवाळी अधिवेशन बंद पाडणार-आ.नीलेश लंके



**मुंबई-**मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही, तर मराठा आमदारांकडून हिवाळी अधिवेशन बंद पाडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नीलेश लंके यांनी दिला आहे. राज्यभर राजकीय नेत्यांना गावबंदी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असताना नीलेश लंके यांनी घेतलेल्या भूमिकमुळे सर्वांचेच लक्ष वेधले गेले आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी अजित पवार गटाला पाठिंबा दिलेला असताना नीलेश लंके यांच्या या विधानामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. आरक्षणाच्या मुद्यावर सत्ताधारी आमदाराच आक्रमक झाल्याचे यामुळे पाहायला मिळाले आहे.

सध्या राज्यभर मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटलेला आहे. मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील जवळपास सर्वच गांवात मराठा समाजाने नेत्यांना गावबंदी केली आहे. अनेक ठिकाणी उपोषण सुरु आहे. यातच मावळमधील कार्ला इथे देखील मराठा समाजातील बांधव आरक्षणासाठी उपोषणाला बसले आहेत. यावेळी याठिकाणी पारनेरचे आमदार नीलेश लंके यांनी भेट दिली. त्या वेळी नीलेश लंके यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर वरील इशारा दिला आहे.मराठा समाजाला आरक्षण मिळाले नसल्याने राज्यभरातील गावांमध्ये नेते आणि मराठा आंदोलक यांच्यात वाद वाढत आहे. अनेक ठिकाणी नेत्यांना समाजाच्या रोषाला देखील सामोरे जावे लागले. मात्र, नीलेश लंके यांना कोणत्याच प्रकारचा विरोध झाला नाही. त्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन मराठा समाजाच्या आंदोलकांशी चर्चा केली. सर्व मराठा समाजातील आमदार मिळून आम्ही हिवाळी अधिवेशन बंद पाडू, असा इशारा या वेळी लंके यांनी राज्य सरकारला दिला आहे.

# कन्नडमध्ये ४०० फुटाच्या मोबाईल टॉवरवर चढून मराठा समाजबांधवाचे आंदोलन सुरु

**कन्नड-**महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी पण प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठी अंतरवली सराटी या ठिकाणी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी कन्नड तालुक्यातील धनगरवाडी येथील रमेश पवार, सोमनाथ वाघचौरे, प्रविण वारे, समाधान जिवरख या ४ तरुणांनी औराळा येथील श्री लक्ष्मीदेवीच्या मंदिरासमोरील ४०० फुटाच्या मोबाईल टावर वर चढून शोले स्टाईलने ठिय्या आंदोलन करत राज्य सरकारच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत सरकारचा निषेध करत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या कडे शासनाने ३० दिवसाचा वेळ मागीतला होता तरी देखील जरांगे पाटलांनी शासनला ४० दिवसाचा वेळ दिला होता. तरी देखील शासनाने मराठा आरक्षणाच्या बाबतीत कुठलाही ठोस निर्णय न घेतल्याने आक्रमक झालेल्या मराठा तरुणांनी जीव धोक्यात टाकत ४०० फुटाच्या मोबाइलच्या टॉवरवर चढून आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.या शोले स्टाईलच्या आंदोलनाची माहिती देवगाव रंगारी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल मोरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास खांडखुळे आंदोलन स्थळी दाखल झाले. टावर चढलेल्या मराठा तरुणांशी सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल मोरे यांनी संपर्क करुन टोकाचे पाऊल उचलू नका खाली या आपल्या सर्व मागण्या शासनाला कळविण्यात येतील अशी विनंती केली परंतु जोपर्यंत महसूल विभागाचा एकदा मोठा जबाबदार अधिकारी आमच्या मागण्याचे आश्वासन पूर्ण करण्याचे लेखी देत नाही तोपर्यंत आम्ही हे आंदोलन मागे घेणार नाही असा पवित्रा आंदोलन कर्त्यांनी घेतल्याने पोलिस प्रशासनाची चांगलीच पंचायत झाली आहे.महसुली विभागाचा जबाबदार अधिकारी येऊन त्यांनी आम्हाला लेखी आश्वासन द्यावे, असा पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतल्याने सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल मोरे यांनी तहसील कार्यालयाशी संपर्क साधत जबाबदार अधिकाऱ्याला आंदोलन स्थळी पाठवण्याची विनंती केली. लगेच तहसील प्रशासनाकडून नायब तहसीलदार मोनाली सोनवणे या थोड्याच वेळात दाखल होऊन आंदोलन स्थळी येत असल्याची माहिती सहाय्यक पोलिसांनी दिली.

# आमदार अपात्रतेप्रकरणी नवीन वेळा पत्रक येण्याची शक्यता-राहुल नार्वेकर



**मुंबई-**शिवसेनेच्या आमदार अपात्र दिरंगाई प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तयार केलेल्या वेळापत्रकाबाबत सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. त्यानंतर अध्यक्षांना आज पुन्हा सुनावणीबाबत सविस्तर माहिती देऊन सुधारित वेळापत्रक न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश अध्यक्षांना सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांच्याशी चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. वास्तविक दोन दिवसांपूर्वी सविस्तर चर्चा झाल्याची माहिती देखील समोर आली आहे. त्यामुळे आता नवीन वेळापत्रकाबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.मागील वेळी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना अत्यंत कठोर शब्दांत फटकारले होते. तसेच या प्रकरणी सुनावणीचे नवीन वेळापत्रक सादर करण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने ३० ऑक्टोबरपर्यंत नवे वेळापत्रक सादर करण्याच्या सूचना वकीलांना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्ष महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांची भेट घेणार आहे. त्या अनुषंगाने वेळापत्रकात नेमके काय बदल करायचे? यावर कायदेशीर सल्ला घेतला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.११ मे पासून अध्यक्षांनी काहीही केलेले नाही. विधानसभा अध्यक्षांना निर्णय घ्यावेच लागेल. ते दैनंदिन काम करतात त्यानुसार निर्णय घ्यावा लागेल. जर तुम्ही ठोस निर्णय घेत नसाल तर आम्हाला निर्णय घ्यावा लागेल. याचिका निवडणूक आयोगासमोर नाही तर अध्याक्षांसमोर आहे. आतापर्यंत झालेले छोटे मोठे निर्णय आम्हाला सांगू नका, अध्यक्षांचे वेळापत्रक द्या. दसऱ्याच्या सुट्टीमध्ये अध्यक्षांसमोर बसून तुषार मेहता वेळापत्रक ठरवतील. असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

# पंतप्रधान हे एक संवैधानिक पद, त्याची प्रतिष्ठा राखायला हवी:शरद पवार

**मुंबई-**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पद हे संवैधानिक आहे. त्या पदाची प्रतिष्ठा राखायला हवी, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रत्युत्तर दिले आहे. माझ्या कार्यकाळात देशातील शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय झाले असल्याचा दावा शरद पवार यांनी केला. २००४ ते २०१३-१४ या कार्यकाळात शेतमालाला दिलेल्या हमी भावाची यादीच शरद पवार यांनी वाचून दाखवली. इतकेच नाही तर २००४ मध्ये आपल्याला अन्नधान्य आयात करावे लागत होते. ते २००४ ते २०१३-१४ दरम्यान निर्यात करणारा देश होण्यापर्यंतचा प्रवास शरद पवार यांनी उलगडण्याचा प्रयत्न केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी शिर्डी दौऱ्यादरम्यान शरद पवार यांच्यावर टीका केली होती. या टीकेला आज शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले. माझ्या कार्यकाळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कर्ज माफ करण्याचा निर्णय झाला असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे. मस्यपालनासाठी वेगळ्या महामंडळाची स्थापना केली असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले आहे. आमच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना चांगला हमीभाव मिळाला असल्याचा दावा देखील शरद पवार यांनी केला आहे.शेतकऱ्यांना दिलेल्या अनुदानाचा फायदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना झाला असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे. मी देत असलेली आकडेवारी ही केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी असल्याचा दावा देखील शरद पवार यांनी केला आहे. मी कृषीमंत्री असताना नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन सुरू केले होते. यातून भाजीपाला उत्पादन वाढले, असल्याचा दावा देखील शरद पवार यांनी केला आहे.

# नुतन इमारतीतून सर्वसामान्यांच्या न्यायदानाची प्रक्रिया गतिमान करा– पालक न्यायमूर्ती अविनाश घरोटे

## ब्रह्मपुरी येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नुतन इमारतीचे उद्घाटन







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सामान्य नागरिकांचा न्यायप्रणालीवर विश्वास आहे. न्यायालयाच्या एका निर्णयाने लोकांचे आयुष्य बदलू शकते. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाकडे लोक आशेने पाहत असतात. त्यामुळे या नुतन इमारतीतून सर्वसामान्यांच्या न्यायदानाची प्रक्रिया गतिमान करावी असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अविनाश घरोटे यांनी केले.

ब्रह्मपुरी (जि. चंद्रपूर) येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर चंद्रपूरच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृद्धी भीष्म, ब्रह्मपुरीचे दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी श्रीमंत चक्कर, सह. दिवाणी न्यायाधीश श्री.गुट्टे, तालुका अधिवक्ता संघाचे अध्यक्ष हेमंत उरकुडे आदीं उपस्थित होते.न्यायालयाच्या नुतन इमारतीच्या उद्घाटनाप्रसंगी अत्यानंद होत असून या

### न्यायालयाच्या नुतन इमारतीची पाहणी

**यावेळी पालक न्यायमुर्ती अविनाश घरोटे यांनी ब्रह्मपुरी दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नुतन इमारतीची पाहणी केली. त्यासोबतच न्यायालयाच्या जुन्या इमारतीची देखील पाहणी केली.**

ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होता आले, असे सांगून पालक न्यायमुर्ती अविनाश घरोटे म्हणाले, अथक परिश्रमातून दिवाणी व फौजदारी न्यायालयाची नवीन इमारत पूर्णत्वास आली आहे. ब्रह्मपुरी हे ऐतिहासिक शहर आहे. या तालुक्यास विद्यानगरी असे संबोधले जात असून शिक्षणाचे माहेरघर सुद्धा मानले जाते. जुन्या न्यायालयाची वास्तू ब्रिटिशकालून असून त्याचा वेगळा इतिहास आहे. इतिहासकालीन इमारतीमधून नव्या इमारतीत स्थानांतरित होणे, ही सुखद बाब आहे. न्यायालयात शिपाई पदापासून तर न्यायाधीश पदापर्यंत सर्वजण आपापली कार्य पार पाडत असतो. आपले कार्य प्रामाणिकपणे करून न्यायालयाचे नाव उज्वल करावे तसेच धकाधकीच्या जीवनात आपले आरोग्य सांभाळून कायद्याचे पालन करावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला.ते पुढे म्हणाले, गौरवशाली इतिहास, समृद्ध वारसा, अनोख्या चालीरीती, परंपरा आणि चांगले न्यायाधीश व नामवंत वकिलांच्या सहयोगाने ब्रह्मपुरी शहराला उत्तम दर्जा बहाल केला आहे. ब्रह्मपुरी न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनासाठी उपस्थित राहणे, ही आनंदाची बाब आहे. न्याय मिळवणे हा संविधानाचा सर्वात मूलभूत सिद्धांत आहे. कायद्याचे ज्ञान, अनुभव त्यासोबतच नवीन सोयीसुविधा, संगणक, आर्टीफिशियल इंटेलिजन्सी या संसाधनाचा उपयोग करून पक्षकारांच्या केसेस निकाली काढण्याकरीता किती चांगल्या प्रकारे उपयोग करता येईल व लवकरात लवकर न्याय देता येईल याची खात्री करावी, असे वकिलांना सांगितले. स्पष्टवादीता ही मानवाला कायम पुढे नेत असते. पक्षकारास कायद्याची खरी बाब समजावून सांगावी. त्यामुळे पक्षकाराचा आपल्यावरचा विश्वास दृढ होईल, असेही ते म्हणाले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृद्धी भिष्म म्हणाल्या, या कार्यक्रमाचा खरा कणा हा पक्षकार आहे. पक्षकार, वकील व न्यायाधीशांच्या सोयी–सुविधीसाठी ही वास्तू मूर्त स्वरूपात उभी आहे. या इमारतीच्या उभारणीत अनेकांचे सहकार्य लाभले. ब्रह्मपुरी शहराला ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा लाभलेला असून धार्मिक महत्व देखील आहे, असे त्या म्हणाल्या. तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

### पालक न्यायमूर्ती यांच्या हस्ते इमारत बांधकामास योगदान दिल्याबद्दल सत्कार:

**न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या बांधकामास योगदान दिल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागिय अभियंता श्री. चहारे, कार्यकारी अभियंता (विद्युत) श्रीमती वर्मा, कंत्राटदार के.सी.पटेल यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन तसेच हिंदू ज्ञानमंदिर, ब्रह्मपुरी येथील विद्यार्थिनींनी महाराष्ट्र गीत सादर केल्याबद्दल त्यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी, आमदार विजय वडेट्टीवार यांच्यासह उपविभागीय अधिकारी संदीप भस्मे, तहसीलदार उषा चौधरी, मुख्याधिकारी आर्शिया जुही याच्यांसह जिल्ह्यातील न्यायाधीश आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन न्यायाधीश माधुरी केवलगोटे व ऋषिकेश हिंगणगावकर तर आभार दिवाणी न्यायाधीश श्रीमंत चक्कर यांनी मानले.**

# 'आशां' चे वरोरा पं.स.परीसरात आंदोलन

## आंदोलन स्थळी तिव्र घोषणाबाजी; १० दिवसांपासून संप सुरूच




**वरोरा । प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष आशा व गटप्रवर्तक महिला आपल्या विविध मागण्यासाठी वारंवार आंदोलन करत आहेत. मात्र याकडे दुर्लक्ष केले जात असून आता पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत आपल्या मागण्यासाठी संप व आंदोलनाची सुरुवात केली आहे. दिनांक १८ ऑक्टोंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला होता त्यानुसार हा संप सुरू झाला आहे. अजून पर्यंत संपावर तोडगा न निघाल्यामुळे याचा परिणाम फार मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेवर जाणवु लागला आहे.

आशा व गटप्रवर्तक महिलांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा व त्याचे वेतन मिळावे. जोपर्यंत शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळत नाही तोपर्यंत दरमहा २५ हजार रुपये वेतन मिळावे.ऑनलाईन कामाची सक्ती नको या प्रमुख मागण्यासह विविध मागण्यासाठी दिनांक १८ ऑक्टोंबर पासून वरोरा पंचायत समिती कार्यालय आवारात प्रचंड घोषणाबाजी करत आशा वर्कर व गटप्रवर्तक महिलांचा काम बंद बेमुदत संप चालू आहे. प्रचंड घोषणाबाजी असल्याने सदर परिसर दणाणून गेला होता .

## जिल्ह्यात उभे राहणार ५२ नवीन तलाठी कार्यालय

# पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळे १८ कोटी १९ लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच गावपातळीवरील प्रशासकीय कारभार उत्तम रितीने चालावा, यासाठी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष पुढाकारामुळे ५२ नवीन तलाठी कार्यालयाची निर्मिती होणार आहे. त्यासाठी विशेष बाब म्हणून १८ कोटी १९ लक्ष २४ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. याबाबत महसूल व वनविभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

चंद्रपूर हा नक्षलग्रस्त आणि दुर्गम भाग असल्याने तेथील गावांमध्ये प्रशासकीय कामकाम उत्तमरित्या चालावे, गावातील नागरिकांना आवश्यक असलेले महत्वाचे दाखले, कृषीविषयक नोंदी / कागदपत्रे वेळेत मिळावेत, यासाठी नवीन तलाठी कार्यालयांची आवश्यकता होती. याबाबत प्रशासनाकडून सुरवातीला ७ कोटी ८० लक्ष रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासह तलाठी कार्यालयाची निर्मिती करण्यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला सुचना केल्या. त्यानुसार विशेष बाब म्हणून १८ कोटी १९ लक्ष २४ हजार रुपयांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आला. राज्य शासनाने या प्रस्तावाला नुकतीच मंजूरी दिली असून नवीन तलाठी कार्यालय व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा मार्ग मोकळा झाला आहे.



यात पोंभुर्णा तालुक्यात ११, चंद्रपूर तालुक्यात ६, बल्लारपूर तालुक्यात ७ आणि मुल तालुक्यात २८ असे एकूण ५२ नवीन तलाठी कार्यालये उभारण्यात येणार आहे.गावपातळीवरील राज्य शासनाचा महत्वाचा घटक म्हणून तलाठ्यांकडे अनेक प्रशासकीय कामे सोपविण्यात आली आहेत. यात गावपातळीवरील २१ गाव नमुने तयार करणे, ते अद्ययावत करणे, वारसान नोंदी घेणे, खरेदी–विक्री व्यवहारानुसार सातबारावर फेरफार नोंदी घेणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात नुकसानीचे पंचनामे करणे, नागरिकांना नुकसान भरपाईबाबत प्रक्रिया राबविणे, त्याचा अहवाल शासनाकडे सादर करणे, रहिवासी व उत्पनाचा दाखला काढण्यासाठी आवश्यक कागदपत्र नागरिकांना उपलब्ध करून देणे, गावाची पैसेवारी निश्चित करणे, पीक कापणी प्रयोग, ई–पीक पाहणी आदी महत्वाच्या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, कृषी गणना करणे, सातबारा वाटप करणे, ऑनलाईन सातबारा नागरिकांना उपलब्ध करून देणे आदी महत्वाच्या कामामुळेच तलाठी हा गावपातळीवरील प्रशासनाचा मुख्य कणा मानला जातो.

**या ठिकाणी होणार नवीन तलाठी कार्यालये**

**पोंभुर्णा तालुक्यातील वेळवामाल, चेकबल्लारपूर, डोंगरहळदी, उमरी पोतदार, घोसरी, देवाडा (बुर्ज), देवाडा (खुर्द), नवेगाव मोरे, जाम तुकुम, फुटाना मोकासा आणि चेक ठाणेवासना. चंद्रपूर तालुक्यातील अजयपूर, पिंपळखुट, जुनोना, पद्मापूर, बोर्डा, दुर्गापूर चांदा रयतवारी. बल्लारपूर तालुक्यातील पळसगाव, मानोरा, कवडजाई, कळमना, विसापूर, कोठारी, बामणी, मूल तालुक्यातील मरेगाव, भादुर्णी, उश्राळाचक, केळझर, राजगड, पिपिरी दीक्षित, भेजगाव, चिंचाळा, सुशी दाबगाव, ताडाळा, नांदगाव, मूल, राजोली, नवेगाव, कोसंबी, कांतापेठ (रै), चिरोली, गडीसुर्ला, बोंडाळा (भुज), मारोडा, चिखली माल, चिमढा, हळदी गावगन्ना, बोरचांदली, सिंताळा, जुनासुर्ला, बेलघाटा माल आणि डोंगरगाव येथे नवीन तलाठी कार्यालय निर्माण होणार आहे.**

### चंद्रपूरात उद्यापासून श्री संत नगाजी महाराज पुण्यतिथी उत्सव तसेच भव्य शोभायात्रेचे आयोजन

## रक्तदान शिबिर कार्यक्रम तसेच रक्तदात्यांचा सत्कार!

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत नगाजी महाराज यांचे पुण्यतिथी निमित्त नांक २९ रविवार व ३० सोमवार २०२३ ऑक्टोबरला श्री संत नगाजी महाराज देवस्थान समाधी वार्ड चंद्रपूर येथे उत्सव आयोजित करण्यात आला आहे. दोन दिवस चालणाऱ्या भव्य दिव्य कार्यक्रमात श्रींची घटस्थापना, रांगोळी स्पर्धा, पाक कला स्पर्धा, तसेचयावर्षी नाभिक समाजाकडून



दिंडी व भव्यशोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहेत. तरी नाभिक समाजातील भाविक बांधव, भगिनींनी श्री संत नगाजी महाराजांच्या शोभा यात्रेस रविवार दिनांक २९ ऑक्टोंबरला सायंकाळी चार वाजता निघणारा शोभा यात्रेस उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी करण्यात आले आहे. सोमवार दिनांक ३० ऑक्टोबरला श्री च्या मृत्यूचे अभिषेक, श्रींच्या पोथीचे पारायण, रक्तदान शिबिर कार्यक्रम,रक्तदान शिबिर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.तसेच मागील वर्षी ज्या रक्तदात्यांनी रक्तदान केले त्या सर्व रक्तदातांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला आहे. अशा रक्तदात्यांनी या भव्य शिबिरात आपले रक्तदान करून एखाद्याला जीवनदान द्यावे, यापेक्षा दुसरे दान असू शकत नाही. म्हणून प्रत्येकाने रक्तदान केले पाहिजे. रक्तदान शिबिरात आवर्जून रक्तदात्यांनी रक्तदान करावे असे आवाहन त्याकडून करण्यात आले आहे. दहीहंडी आणि काला, प्रवचन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, क्रीडा सांस्कृतिक, कला, आध्यात्मिक क्षेत्रातील, रांगोळी पाक कला स्पर्धेचे वितरण, कार्यक्रमाच्या अंती महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी सर्व भाविक भक्तांनी होणाऱ्या पुण्यतिथी उत्सवास आवर्जून उपस्थित राहण्याचे आव्हान श्री संत नगाजी महाराज उत्सव समितीकडून करण्यात येत आहे.

# भद्रावती येथे श्री संत नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन आज आणि उद्या

**भद्रावती । डॉ. यशवंत घुमे**

नाभिक समाज भद्रावती आणि श्री संत नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव समितीच्या वतीने आज दिनांक २९ व उद्या दिनांक ३० ऑक्टोंबर २०२३ रोज रविवार व सोमवारला स्थानिक नगाजी नगरातील श्री संत नगाजी महाराज मंदिरात संत नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दोन दिवसीय या कार्यक्रमात आध्यात्मिक, सामाजिक, बौद्धिक तथा सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

२९ तारखेला रविवारी सकाळी ७ वाजता श्रीं ची घटस्थापना, पूजा व आरती वामनराव चौधरी, बापूरावजी जुनारकर यांच्या हस्ते होणार असून यावेळी मुर्लीधरराव मेश्राम, भाऊरावजी दैवलकर, रमेशराव खातखेडे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. दुपारी १ वाजता महिला संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी लोकमान्य विद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राचार्य आशालता सोनटक्के यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्राजक्ता घोटकर, नीता आंबीलकर, सुरेखा अतकरे उपस्थित राहतील . या संमेलनाचे संचालन वर्षा वाटेकर, आभार प्रदर्शन योगिता सैदाणे करतील. सायंकाळी ६.३० वाजता सामुदायिक प्रार्थना व विचार मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून झनकलाल चौधरी, नरेंद्रजी मेश्राम, मुरलीधरजी मेश्राम, केवलराम नागपुरे, सुरेश जमदाडे हे यावेळी प्रामुख्याने उपस्थित असतील. सायंकाळी ७ वाजता लक्ष्मणराव चौधरी यांच्या वाणीतून पोथीचे पारायण होईल . रात्री ८ वाजता ओम शिवशक्ती महिला भजन मंडळ (नगाजी नगर, भद्रावती) यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी सोमवारी ३० तारखेला सकाळी सामुदायिक ध्यान कार्यक्रमानंतर श्रीं चा अभिषेक पूजा आरती आयोजित करण्यात आली आहे. भाऊरावजी दैवलकर, वामनराव चौधरी, बापूरावजी जुनारकर, मुरलीधरजी मेश्राम, रामभाऊ लांडगे, सुरेशराव जमदाडे ,नागपूरकर साहेब, रमेशराव खातखेडे हे यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ८ वाजता पालखी सोहळा व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही शोभायात्रा नगाजी महाराज मंदिर ते नगाजी नगर परिसरात निघणार आहे. या शोभायात्रेत भद्रावती शहरातील नागरिकांनी व नगाजी



महाराज भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. या शोभायात्रेत विश्वकर्मा महिला भजन मंडळ, शिवशक्ती महिला भजन मंडळ, शारदा माता महिला भजन मंडळ प्रामुख्याने असणार आहेत . त्यानंतर दुपारी ११ वाजता नागपूर येथील भाविका खंडाळकर यांच्या जाहीर कीर्तन व गोपालकाल्याचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी २ वाजता नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजुरा येथील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. गोपाल घुमे अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष अनिल धानोरकर, उपाध्यक्ष संतोष आमने, भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते रमेश राजुरकर, शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे माजी उपाध्यक्ष प्रफुल चटकी उपस्थित असतील. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरीश घुमे, आभार बंडू व्हि.लांडगे, संचालन रोशनी शेंडे करणार आहे. यानंतर महाप्रसादाने या दोन दिवशीय पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप होणार आहे. सतत दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव समितीचे अध्यक्ष बंडू व्ही. लांडगे, कार्याध्यक्ष रवींद्र हनुमंते, सचिव सचिन नक्षिणे, उपाध्यक्ष हरीश घुमे, पांडुरंग हनुमंते, कोषाध्यक्ष आशिष चौधरी, सतीश मांडवकर, सहसचिव सुरेश जमदाडे, सुधीर लांडगे, संघटक शंकरराव हनुमंते, सागर घुमे ,हनुमान नक्षिणे, सदस्य सर्वश्री विजय मेश्राम, नंदू नक्षिणे ,बंडू एम. लांडगे, नरेश लांडगे, अंकुश दर्वे, पंकज खातखेडे, निलेश जुनारकर, सतीश जांभुळकर, प्रशांत नक्षिणे, गणेश दैवलकर, अमोल नागतुरे, पियुष घुमे महिला कार्यकारिणी अध्यक्ष सुरेखा अतकरे, कार्याध्यक्ष रागिनी सूत्रपवार, सचिव मोना जांभुळकर, उपाध्यक्ष प्रतिभा नक्षिणे, कोषाध्यक्ष भुवनेश्वरी निंबाळकर, सहसचिव मंजू मेश्राम यांच्यासह सल्लागार समिती सदस्य विठ्ठलराव नागपुरे, प्रकाश दैवलकर, बंडूजी सूत्रपवार, रामभाऊ लांडगे, राजेश येसेकर ,सुभाष मांडवकर, पांडुरंग हनुमंते , प्रमोद क्षीरसागर, संजय अतकरे, श्रीहरी नक्षिणे, सुरेश चांदेकर, मधुकर वाटेकर, गजानन क्षीरसागर, रामकृष्ण आस्कर, अनंता चौधरी,कडूकर सर,दिनकर येसेकर, मंदाताई जुनारकर, विमलताई नक्षिणे, सुधाताई हनुमंते, रजनीताई मांडवकर, लीलाताई चौधरी, शोभाताई लांडगे, मायाताई चिंचोलकर , वर्षाताई वाटेकर, नंदिनी बंडू लांडगे, छायाताई जमदाडे ,योगिता सैदाने, स्मिता नागपूरकर, रंजना लांडगे, कुसुम नागपुरे, गौरी नक्षिणे, किरण दैवलकर, सुरेखा चौधरी, मनीषा नक्षिणे, सविता लांडगे, विजय लांडगे, अनिता निंबाळक,र मंदाताई नक्षिणे ,वैशाली दळवी आणि समस्त कार्यकर्त्यांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .